मुद्रांक शुल्क रूपये २०१००/-

# स्थावर शेतजमिनीचा नोंदणीकृत भाडे करारनामा

मुद्रांकाकरीता किंमत रू.५,०१,०००/-

-:भाडेपट्टा लिहुन देणार:- पार्टी नं.१

**सौ.सुनिता अशोक भवरे**

वय अं. ५२ वर्षे, व्यवसाय :- शेती व घरकाम

रा. वडगांव रोड, यवतमाळ, ता जि. यवतमाळ.

-:भाडेपट्टा लिहुन घेणार:- पार्टी नं.२

**बळीराजासेवा केंद्र फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. तर्फे डायरेक्टर अशोक वासुदेव भवरे**

वय अं. ५६ वर्षे, व्यवसाय :- शेती व व्यापार

रा. वडगांव रोड, यवतमाळ, ता जि. यवतमाळ.

यवम-२
२३२/२०२२
५/२२

सन २०२२ साल कारणे शेतजमिनीचा भाडेकरारनामा लिहून देण्यात येते तो पुढील प्रमाणे :-

पार्टी नं.१ **सौ.सुनिता अशोक भवरे** हे शेत मालक असून त्यांना यापुढे संक्षीप्त मध्ये ''पार्टी क्रमांक १'' असे संबोधिले आहे. तसेच पार्टी नं. २ **बळीराजासेवा केंद्र फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. तर्फे डायरेक्टर अशोक वासुदेव भवरे** हे भाडेकरू असून त्यांना यापुढे ''पार्टी क्रमांक २'' असे संबोधिले आहे.

पार्टी क्र १ यांच्या मालकीची व ताब्यातील मौजा खरोला (भांब) ता. जि.यवतमाळ येथील शेतजमिन गट क्रमांक ८/५, क्षेत्रफळ २.०८ हे.आर, भोगवटदार वर्ग १ यापैकी 0.२१ आर(अर्धा एकर) शेतजमिन पार्टी नंबर २ यांना पुढील २९ वर्षाकरीता भाड्याने देत आहे. सदर शेतजमिन याला यापुढे ''मालमत्ता'' असे संबोधले जाईल. या शेतजमिनीच्या चतु:सिमा :-

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | गट नंबर ७ |
| पश्चिमेस | - | गट नंबर २० व राष्ट्रीय महामार्ग ३६१ |
| उत्तरेस | - | गट नंबर ८/४ व ८/५ मधील उर्वरीत जमिन |
| दक्षिणेस | - | पांदण रस्ता |

The Seal of the Joint Sub-Registrar Yavatmal No 2 Yavatmal

| |
|---|
| य व न - ८ |
| 232 / 2022 |
| ६ / 22 |

सदर मालमत्ता पार्टी नं.२ यांनी पार्टी नं.१ यांचे पासून खालील करार अटी व शर्तीवर भाड्याने घेतले आहे. त्याचा तपशिल :-

पार्टी नं.२ यांना या भाडेकराराचा विषय असलेली मालमत्ता ही **नानाजी देशमुख संजीवनी प्रकल्प योजनेअंतर्गत गोदाम बांधुन** वापरायचे असल्याने पार्टी नं.२ ने पार्टी नं.१ कडून सदरची मालमत्ता दिनांक ०१/०१/२०२२ पासून भाड्याने २९ वर्षाकरीता भाड्याने घेतलेली आहे. सदर मालमत्ता संस्थेतर्फे संचालीत करण्यात येणा-या सर्व वास्तु उभ्या करण्यासाठी ताबा दिलेला आहे.

पार्टी नं.२ ने पार्टी नं.१ कडून भाडेपट्याचा विषय असलेली सदरची मालमत्ता वार्षिक १२०००/- (बारा हजार रूपये) प्रमाणे भाड्याने घेतलेली असल्याने पार्टी नं.२ हा न चुकता वर्ष संपताच ताबडतोब पार्टी नं.१ ला पुढील वर्षाची भाड्याची रक्कम ॲडव्हान्स मध्ये देईल असे पार्टी नं.२ ने या भाडे करारनाम्याव्दारे कबुल व मान्य केले आहे.

सदर जागेवर बांधकामाव्यतिरिक्त वहिवाटी व आपल्या ईच्छेनुसार वापर करण्यास आपला परिपुर्ण अधिकार राहिल. स्वंतत्र विज पुरवठा घेवू शकता त्यास सुध्दा पार्टी क्र.१ ची संमती आहे. तसेच जागेवर आकारण्यात येणा-या सर्व प्रकारचे कर भरण्याची जबाबदारी पार्टी क्र.२ यांची राहिल.

सदर मालमत्तेवर आवश्यकता असल्यास तुम्ही तुमच्या मर्जीप्रमाणे कायदेशिर परवानगी घेवून बांधकाम करू शकता त्याची लेखी संमती मी याव्दारे लिहून देत आहे. सदरचा भाडेकरारनामा/लिज हे नोंदणीकृत करण्यात येत असून या करारनाम्याची अस्सल प्रत पार्टी नं. २ जवळ राहिल व झेरॉक्स प्रत पार्टी नं.१ कडे राहिल व पार्टी नं.१ व पार्टी नं.२ यांनी आपआपल्या कराराचा भाग अटी व शर्ती कबुल करून यावर आपआपल्या सह्या खालील साक्षदारासमक्ष केलेल्या आहेत.

The Seal of the Joint Sub-Registrar, Yavatmal
सह. दुय्यम निबंधक, यवतमाळ क्र. २

Scanned with CamScanner

सबब हा भाडेपट्टा/लिज करारनामा पार्टी नं.१ व पार्टी नं.२ यांना कबुल असून त्यांचेवर व त्यांचे वारसास, उत्तराधिकारी यांचेवर लागु व बंधनकारक आहे व राहिल.

यवतमाळ,
दिनांक २७/०१/२०२२

साक्षदार

१- Pkhakse
सौ. पुष्पलता निरंजन खाकसे

SU Manwar
२-





सह्या

AMBhavare

सौ.सुनिता अशोक भवरे
पार्टी नं.१ भाडेपट्टा लिहुन देणार

BALIRAJASEVA KENDRA FARMER
PRODUCER COMPANY LIMITED

Director

बळीराजासेवा केंद्र फार्मर प्रोड्युसर
कंपनी लि. तर्फे डायरेक्टर
अशोक वासुदेव भवरे
पार्टी नं.२ भाडेपट्टा लिहुन घेणार

| य व म-२ | |
|---|---|
| २३२ | २०२२ |
| | ६/२२ |

The Seal of the Joint Sub-Registrar Yavatmal No.2 Yavatmal
सह दुय्यम निबंधक, यवतमाळ क्र.२
सत्यमेव जयते
शासकीय मुद्रा